जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - दिनांक - ०१/०९/२०२४**

सहकारनगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## पत्नीचा गळा आवळुन खुनाचा प्रयत्न करणारा पाहिजे असलेल्या आरोपीस केले जेरबंद

दि. २४/०८/२०२४ रोजी फिर्यादी यांचे चारित्र्यावर संशय घेत भांडणे करून मारहाण करित असताना हाताने फिर्यादी यांचा गळा दाबुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला. त्याबाबत सहकारनगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं.२७५/२०२४, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०९(१) प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयात फिर्यादी यांचा पती सत्यवान मोहिते हा गुन्हा झाले पासुन पाहिजे आरोपी होता.

दि.२९/०८/२०२४ रोजी सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार असे सहकारनगर पोलीस ठाणे येथे हजर असताना **पोलीस अंमलदार महेश मंडलीक यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की पत्नीचा गळा आवळुन तिचा जिवे मारण्याचा प्रयत्न केलेल्या गुन्हयात पाहिजे असलेला आरोपी नामे सत्यवान मोहिते हा शाहु बँक चौक धनकवडी येथे येणार आहे** अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने सदरची बातमी सहकारनगर पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षक छगन कापसे यांना कळविली असता त्यांनी लागलीच सुचना व मार्गदर्शन करून बातमीचे ठिकाणी जावुन कारवाई करण्याचे आदेश दिले.

त्यानुसार सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी बातमीचे ठिकाणी जावुन छापा टाकुन आरोपीस ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव **सत्यवान अनिल मोहिते वय २६ वर्षे, रा.मु.पो.शेळगाव ता इंदापुर जि पुणे** असे सांगितले असुन त्याच्याकडे सहकारनगर पोलीस ठाणे येथे गुरनं २७५/२०२४ दाखल गुन्हयाच्या अनुशंगाने विश्वसात घेवुन चौकशी करता त्याने सदरचा गुन्हा केल्याचे कबुल केल्याने त्यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे श्री.प्रविणकुमार पाटील पोलीस उपायुक्त परि.-२,पुणे श्रीमती स्मार्तना पाटील मा,सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग श्रीमती नंदिनी वग्यानी सहकागनगरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.छगन कापसे, पोलीस निरीक्षक (गुन्हे)श्री.उत्तम भजनावळे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे सहा पोलीस निरीक्षक सागर पाटील,महिला पोलीस उप-निरी. कल्पना काळे,सहा.पो.उप-निरी बापु खुटवड,पोलीस अंमलदार,महेश मंडलिक, अमोल पवार, चंद्रकांत जाधव,किरण कांबळे,बजरंग पवार,सागर सुतकर, अमित पदमाळे, सागर कुंभार,खंडु शिंदे,विशाल वाघ,बबलु भिसे,योगेश ढोले,महेश भगत यांनी केली आहे.